**<u>सेशन केस क्र ११ सन २०१८</u>** **निशाणी ५०**

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ६ ची साक्ष

मी या द्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | अविनाश हौशिराम भोर, |
| वय सुमारे | - | ५० वर्ष |
| उद्योग | - | शेती |
| निवास स्थान | - | चैतन्य नगर, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर. |

**<u>इन कॅमेरा</u>**

**<u>सरतपासणी - सहायक सरकारी वकील श्री. जे. के. दिवटे यांचेतर्फे -</u>**

१. दिनांक ०३.१२.२०१७ रोजी मला घारगांव पोलीस ठाण्यात बोलाविले होते. तेथे इनामदार साहेब होते. पिडीतेच्या आईचे नाव साक्षीदाराने सांगितले. पिडीतेची ओळख गुप्त ठेवण्यासाठी ते नाव येथे नमुद केलेले नाही. तिने पिडीतेचे कपडे पोलीसांसमोर हजर केले. ते कपडे हिरव्या रंगाचा टॉप, हिरव्या रंगाची चुस्ती/सलवार, पिवळया रंगाची स्लीप, निळया रंगाची निकर व काळया रंगाच्या चपलांचा जोड होते. पोलीसांनी सदर वस्तू जप्त केल्या व त्याबाबतचा पंचनामा केला. मला आता पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ५१** दिला. त्या वस्तू दाखविल्या तर मी ओळखेल. सदर वस्तू साक्षीदाराला दाखविल्या. त्या त्यांनी ओळखल्या. साक्षीदाराला दाखविलेल्या मुद्देमालामध्ये चपला दिसून येत नाही. साक्षीदाराने ओळखलेल्या कपड्यांना अनुक्रमे आर्टीकल क्रमांक A ते D दिले.

सरतपास पूर्ण.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री जे. एच. वामन मार्फत</u>**

२. पंचनाम्यासाठी मला लेखी पत्र प्राप्त झाले नव्हते. मी पोलीस ठाण्यात पोहोचण्यापूर्वी पिडीतेची आई पोलीस ठाण्यात होत्या, हे म्हणणे खरे आहे. माझी त्यांची प्रत्यक्ष भेट झाली नाही, हे म्हणणे खरे आहे. पोलीसांनी सदर कपडे कोठून आणले होते हे मला व्यक्तीश्: मला माहित नाही. सदर कपडे पिडीतेचे असल्याचे मला पोलीसांनी सांगितले म्हणून मी पंचनाम्यावर सही केली, हे म्हणणे खरे आहे. यापूर्वी मी अनेक खटल्यांमध्ये पंच

म्हणून काम केलेले आहे.  यापूर्वी मी तीन-चारशे खटल्यांमध्ये पंच म्हणून  काम केलेले आहे, हे म्हणणे खरे आहे.  मी पोलीसांचा नेहमीचा पंच असल्यामुळे खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.  माझ्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही, हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

Sd/---

( मंदार नेरलेकर )
अति. सत्र न्यायाधीश
संगमनेर

संगमनेर
दिनांक १५/१०/२०२५